# भूमिका

ग्रामीण भागात राहून पद्‌भूषण कर्मवीर आण्णांच्या 'रयत शिक्षण संस्थेतील' छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे मराठी विषय घेऊन बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर शिक्षणाची गोडी वाढत गेली. मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रकारांनी आणि साहित्यकृतींनी मनाला सुखावले. आत्मबल दिले. त्यातच महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठली रामजी शिंदे यांच्या तत्वज्ञान, विचारांचा वारसा विचारांना घडवत गेला. त्यांच्या तत्वज्ञानाचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला. ग्रामीण, दलित जीवनाचे चित्रण करणारी अनेक पुस्तके वाचनात आली. ग्रामीण, दलित जीवनाचे चित्रण मनाला आपलेसे वाटू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या जीवनात एक अभूतपूर्व अशी क्रांती घडवून आणली. या क्रांतीचा परिणाम म्हणजे त्यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली. त्यांच्या कार्यामुळे संपूर्ण दलित समाज प्रभावित झाला. दलितांच दु:ख दलित साहित्याच्या रुपाने कागदावर उमटू लागले. अशा अनेक दलित साहित्याच्या पुस्तकांचे वाचन झाले. दलित काव्य, कथा, आत्मकथने, कादंबरी, नाटक आदी वाङ्‌मयप्रकारांनी मनाला अंत:र्मुख केले. दलित वाङ्‌मयातील दु:ख, वेदना, विद्रोह, नकार, चीड याची जाणीव अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल, दया पवार, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, माधव कोंडविलकर, लक्ष्मण माने, यांच्या साहित्यकृतीतून आली.

दलित साहित्याचे वाचन घडत असतानाच एम.ए. चे पदवीत्तर शिक्षण घेताना 'एका वाङ्‌मय प्रकाराचा अभ्यास' म्हणून 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचा अभ्यास झाला. त्यात लक्ष्मणशास्त्री हळबे यांच्या 'मुक्तामाला' पासून ते उध्दव ज. शेळके यांच्या 'धग' अशा आठ सामाजिक आशयांच्या कादंबऱ्या अभ्यासाव्या लागल्या. त्यातून तत्कालीन सामाजिकतेचे दर्शन घडले. मराठीतील कादंबरी लेखनाचा विकास लक्षात येण्यास चांगला उपयोग झाला. 'कादंबरी' हा सर्वात अधिक लोकप्रिय असा साहित्य प्रकार आहे. या कादंबरी लेखनाने एके काळी समाज जागृती घडवून आणली आहे. कादंबरीतून रंजक अशा कथानकाच्या

आधारे लेखक मानवी जीवनाचे चित्र रेखाटत असतो. ह. ना. आपटे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून तत्कालीन समाजाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. मनोरंजनात आणि अद्‌भूततेत रमलेली मराठी कादंबरी हरिभाऊ आपटे यांनी वास्तवाकडे वळविली त्यादृष्टीने विचार करता त्यांना कादंबरी वाङ्मयाचे सम्राट म्हटले जाते. इंग्रजी राजवट आणि इंग्रजी शिक्षण यामुळे नवविचारांचा परिचय महाराष्ट्रातील तत्कालीन तरुण पिढीला झाला. त्यामुळे 'कादंबरी' लेखनातील आशय आणि त्याची अभिव्यक्ती यांचे स्वरुपही हळूहळू बदलत गेले. सुरुवातीच्या काळात अद्‌भूतरम्य स्वरुपाचे कादंबरी लेखन झाले असले तरी हरिभाऊ आपटे यांनी समकालीन जीवनाचे दर्शन आपल्या कादंबरी लेखनातून घडविले. आपल्या समाजाची स्थिती-गती त्यांच्या कादंबरी लेखनातून चित्रित झाली. नंतरच्या कालखंडात अनेक कादंबरीकारांनी कादंबरी लेखनाने मराठी साहित्य समृध्द केले आहे.

महाविद्यालयीन पदवीत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ही 'कादंबरी' साहित्य प्रकाराचे वाचन होत राहिले एम ए.बी एड नंतर देऊर येथील कला महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन करीत असताना 'कादंबरी' वाङ्मयाचे अध्यापन घडू लागले त्यानंतर एम फिल. विषय निवडीच्या निमित्ताने वाई येथील 'किसन वीर कॉलेज'चे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. टापरे सर यांच्याशी चर्चा होऊन 'दलित कादंबरी'चे लेखन करणारे नामदेव चं. कांबळेंची साहित्य अकादमी पुरस्कृत 'राघववेळ' ही कादंबरी वाचनात आली या कादंबरी नंतरच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबऱ्याही वाचल्या. दलित साहित्यातील या अलिकडील कादंबरी लेखनाने अंत:करणाचा वेध घेतला. 'वालंबी' व 'रघू' या व्यक्तीरेखा आगळ्या वेगळ्या वाटल्या. कादंबरीमधील शिक्षणासाठी धडपडणारा, कष्ट सोसणारा, फुले आंबेडकर विचारांचा वारसा जपणारा रघू मला माझेच रुप वाटू लागला. दलित समाजातील 'वालंबी' माय मनात घर करुन राहिली.

मातंग समाजात जन्म घेतलेल्या नामदेव चं. कांबळे यांनी अनुभवलेला दलित जीवनानुभव साहित्यामध्ये मांडताना, नकाराची विद्रोहाची भाषा प्रकट न करता सामंजस्याने मांडल्याने नवल वाटले. कादंबरीतून झालेले म.फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे दर्शन मनाला प्रेरणा देणारे ठरले. कादंबरीत चित्रित झालेले मातंग समाजाचे दु.ख, मांग समाजाचे अज्ञान, रुढी, परंपरा, शोषण, मुक्तीचा संघर्ष, चिंतनीय ठरला आहे

जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. त्यादृष्टीने नामदेव कांबळेंनी दलित जीवनाचे चित्रण आपल्या कादंबरी लेखनातून घडविले आहे. त्यांनी दलित कादंबरी लिहून मराठी कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. त्यांचे इतर साहित्य ही माझ्या वाचनात आले. त्यांचे अलिकडीलच्या काळातील दलित साहित्यलेखन मनाला स्पर्शून गेले आहे आणि मला त्यांच्या साहित्य लेखनावर संशोधन करावेसे वाटू लागले. 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबऱ्यामधील दलित जीवन, विचार व व्यक्त झालेली जीवन जाणीव महत्वाची वाटल्याने हा विषय निश्चित करण्यासाठी मी प्रा.डॉ.सौ.विमल पाटील यांना भेटलो. त्यांनी या विषयासंबंधी होकार देऊन मार्गदर्शन करण्याचे कबूल केल्यावर विषय निश्चिती झाली. विषयाचे संशोधन करीत असताना वाशीमला जाऊन कादंबरीकार श्री.नामदेव कांबळेंना भेटण्याचा योग आला. त्या दृष्टीने त्यांच्याशी केलेली चर्चा या लघु-शोध-प्रबंधास उपयुक्त ठरली. माझा ''नामदेव चं. कांबळे यांच्या कादंबरीचा अभ्यास'' ('उनसावली' 'सांजरंग' च्या आधारे) या विषयातील लघु शोध-प्रबंध एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

# प्रास्ताविक

एम. फिल. प्रबंधिकेसाठी कोणता विषय निवडावा ? असा प्रश्न उपस्थित झाल्यावर प्रा.डॉ.टापरे, मराठी विभाग प्रमुख, वाई, जि. सातारा यांच्याशी झालेल्या चर्चेतून 'नामदेव चं. कांबळे यांच्या 'राघववेळ' व त्यानंतरच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरीचे वाचन झाले. त्यानंतर मार्गदर्शिका आदरणीय प्रा.डॉ सौ विमल केशवराव पाटील यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा होऊन मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच 'नामदेव चं. कांबळे यांच्या कादंबरीचा अभ्यास' ('उनसावली' 'सांजरंग') च्या आधारे हा विषय निश्चित केला.

'दलित साहित्य' या नावाने रुढ झालेल्या वाङ्मयीन प्रवाहने आपले वेगळेपण निश्चित केले आहे ह्या प्रवाहातील साहित्यप्रकारांनी आणि लेखनकृतींनी दलित दु:खाची, वेदनेची जाणीव अनुभूतींतून व्यक्त केली आहे. ह्या प्रवाहातील साहित्यप्रकारांनी आणि लेखनकृतींनी दलित दु:खाची, वेदनेची जाणीव व्यक्त केली आहे. म. फुले, आणि राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या अमूलाग्र परिवर्तनवादी चळवळीतून दलित समजाचे प्रबोधन घडत गेले त्यातून त्यांना माणूसपणाची जाणीव झाली.

दलित समाजात जन्म घेऊन पुरोगामी विचारांच्या वातावरणात सुधारलेल्या समाजात दलितत्व अनुभवायला मिळाले नसले तरी दलित साहित्यातून दलित जीवन वाचायला मिळाले, आणि दलित समाजाच्या दु:खाची जाणीव झाली दलित समाजात जन्म घेतलेल्या, त्यांच्या दु:खाची जाणीव असलेल्या नामदेव चं. कांबळे यांच्या कादंबरी लेखनातून दलित समाजाचे दु:ख व्यक्त झाले आहे. त्यांच्या कादंबरी वाङ्मयाने मला विचार करायला प्रवृत्त केले आणि त्यामुळेच त्यांच्या कादंबरी लेखनावर लघु-शोध-प्रबंध लिहिण्याचे मनाशी ठरविले व आज त्या कामाला पूर्णत्व प्राप्त होत आहे

माझ्या या लघु-शोध-प्रबंधासाठी मला माझ्या महाविद्यालयीन शिक्षिका आदरणीय प्रा डॉ विमल केशवराव पाटील या मार्गदर्शिका म्हणून लाभल्या त्यांनी मला सुरुवातीला विषय निवडीपासून वेळोवेळी सूचना देऊन अनमोल असे मार्गदर्शन केले यामुळेच माझा हा लघु-शोध-प्रबंध मला पूर्ण करता आला. शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. ठाकूर, प्रपाठक डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. किरवले यांनी केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले. तसेच माझे गुरु प्रा बी डी. पाटील, प्रा डॉ सौ. नलिनी महाडीक,

प्रा.डॉ.सौ.भूतकर, प्रा.डॉ.सौ.गायकवाड यांनीही मला अचूक मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्रा.डॉ.यशवंत पाटणे यांनी दिलेली प्रेरणा प्रबंध पूर्ण करण्यास महत्वपूर्ण ठरली. या विषयाच्या अनुषंगाने संशोधन करीत असताना आवश्यकता म्हणून नामदेव कांबळेंशी गप्पा मारण्याचा, त्यांची मुलाखत घेण्याचा योग आला. याकामी आवश्यक ती मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या लघु-शोध-प्रबंधाचे काम करताना देऊर, ता. कोरेगांव येथील मुधाई देवी शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.संभाजीराव कदम व मा.सचिव सर्जेराव कदम यांची प्रेरणा लाभली..कला महाविद्यालय, देऊरचे प्रभारी प्राचार्य डी.बी. शेडगे यांनी केलेले सहकार्य, सहानुभूतीने वेळोवेळी केलेली विचारणा प्रबंध लेखनाच्या कामास पूर्णत्व देण्यास आवश्यक ठरली. या कामी माझे मित्र सहकारी प्रा.अशोक शेलार, प्रा.बाळासाहेब चव्हाण, दिलीप जाधव, सुरेश शिंदे, स्नेही श्री.उत्तम किर्तीकुडाव यांचेही सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे तीर्थस्वरुप आईवडीलांचे आशीर्वाद आणि नोकरी, संसार व चि.सौरभला संभाळून प्रबंधाचे काम पूर्ण करा. असा तगादा लावणारी माझी सौभाग्यवती वैशाली जाधव हिची मदत प्रबंधाच्या पूर्णत्वास महत्वपूर्ण ठरली आहे. या सर्वांचा मी आभारी आहे.

या कामासाठी मला शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय प्रमुख व कर्मचारी, छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातील श्री.गायकवाड, श्री पावसकर व त्यांचे सहकारी, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील ग्रंथपाल व सातारा नगरवाचनालयातील सेवकांनी दिलेली पुस्तके, संदर्भ ग्रंथ महत्वाचे ठरले. या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व बांधणी करुन देणारे 'मे.रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, सातारा' चे श्री. मुकुंद ढवळे आणि त्यांचे सहकारी श्री. राजू कुलकर्णी यांचाही मी आभारी आहे.

VSJadhav.

**विश्वजित साहेबराव जाधव**

दिनांक २७/६/2003.
ठिकाण - सातारा